# SAI TUTORIALS

**Std.: 8 (English)** | **Marathi** | **Marks: 25**

**Date: 23-07-23** | **DOMNIC,SVPV,PAULS,VEDANT,COSMOS,XAVIERS,CARMEL,BANEGAR** | **Time: 1 HR**

**Chapter:**

**Q.1 उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (गद्य)** 8

आता हेच पहा, श्रावण सरता सरता पाऊस कमी व्हायचा; पण नदी वाहतच असायची. आमचा 'कॅनव्हास' म्हणजे खडक मोकळा व्हायला पार चैत्र महिना उजाडायचा. तोवर काय करायचं? त्यातूनच आम्हांला मातीचा नाद लागला. लालभडक, मऊशार माती हाताला लोण्यासारखी वाटायची. मूर्ती कराव्यात असं ठरलं; पण हा मातीचा खेळही लपून छपून करावा लागे. कधी गोठ्याच्या मागच्या बाजूला नाहीतर गावातील मंदिराजवळच्या बकुळीच्या झाडाखाली आमचा उद्योग चालायचा. मूर्ती करून वाळत ठेवल्या, की काही काळानं त्यांना तडे जाऊन ढासळायच्या. हिरमोड व्हायचा. त्यावर काहीतरी उपाय शोधायलाच हवा होता. विचार करता करता लक्षात आलं, की गाईचं शेण ओलं असताना जसं असतं तसंच ते वाळल्यावरही राहतं. त्याला तडे जात नाहीत. आम्ही शेण मातीत मळून घेतलं. आता मूर्ती थोड्या टिकायला लागल्या. तरीही जास्त दिवस झाल्यावर बारीक बारीक तडे जाऊन ढलप्या पडायच्या. पुन्हा विचार सुरू...

**Q.2 खालील कृति करा-पद्य** 6

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तित्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने , नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

**Q.3 शब्दांच्या जाती** 2

1 <u>दृश्य</u> डोळ्यां<u>समोर</u> येते <u>अन्</u> नजरेचे पारणे फेडून <u>जाते.</u>

2 पुढील वाक्यातील सर्वनामे ओळखा
तिला आंबा आवडतो.

**Q.4 समानार्थी शब्द लिहा.** 2

1 i. हित - ...............
ii. घर - ...............

2 i. धेनू - ..................
ii. पान - ..................

**Q.5 विरुध्दार्थी शब्द लिहा.** 2

1 खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहून अर्थ न बदलता वाक्य पूर्ण करा.
गाडी <u>वेगाने</u> चालवू नये.

2 समाधान × ..............
लहान × ..............

**Q.6 पत्रलेखन** **5**

1 खूप पाऊस पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्याबद्दल तक्रारर करणारे पत्र वीजपुरवठा अधिका-याला लिहा.